<u>उलटतपास सर्व प्रतिवादींकरीता विधीज्ञ श्री. जी.जी. पारखे यांच्यावतीने शपथेवर सुरु</u> -

२. हे म्हणणे खरे आहे की, कुरणपूर येथील सर्वे नं.३७/३ या जमिनीचे मुळ मालक कासूबाई तुकाराम चितळकर या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, तिच्या पतीच्या मृत्यूनंतर सदर जमीन वारसा हक्काने कासूबाईला मिळाली. कासूबाई व तिचे पती कधी मयत झाले, याबाबत मला माहिती नाही. कुंडलिक लिंबाजी पारखे हे माझे आजोबा (वडीलांचे वडील) होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.३७/३ या जमिनीचा गहाणखत कासूबाई हिने दि.२९/०८/१९४७ रोजी कुंडलिक लिंबाजी पारखे यांच्या हक्कात लिहून व नोंदवून दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या गहाणाची किंमत १००/- रुपये इतकी होती. हे म्हणणे खरे नाही की, कासूबाई हिने सदरचे गहाणखत लिहून देण्यापूर्वी सदरची मिळकत ही भगवंत कोंडीबा हिवरकर यांच्याकडे कुळ म्हणून होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे गहाणखत हे कासूबाईने कुंडलिक लिंबाजी पारखे यांना तिने घेतलेल्या रक्कमेपोटी धर म्हणून लिहून दिले होते आणि जमिनीचा कब्जा कुंडलिक पारखे यांना देण्यात आला नव्हता.

३. कासूबाई हिने तिच्या हयातीत कुंडलिक लिंबाजी पारखे यांना तिने त्यांच्याकडून घेतलेली रक्कम परत दिली होती, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीच्या पिकपाहणी सदरी आमच्या नावाच्या ज्या नोंदी झाल्या त्या गहाणदार या नात्याने झाल्या. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीला आमच्या नावाच्या नोंदी लागाव्यात म्हणून माझे वडील मल्हारी कुंडलिक पारखे यांनी आरटीएस अपिल क्र.२०५४/२०१४ हे प्रकरण तहसिलदार, श्रीरामपूर यांच्याकडे दाखल केले व दि.१२/०७/२०१६ रोजी त्या प्रकरणाचा निकाल आमच्या बाजूने लागला. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणामध्ये वडीलांनी १९७१ पासून ते २०१४ पर्यंत गहाणदार म्हणून आमच्या नावाची पिकपाहणी सदरी नोंद व्हावी अशी मागणी केली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरटीएस अपिल क्र.२०५४/२०१४ या प्रकरणातील निकालाविरुध्द प्रतिवादींनी अपिल क्र.१५४/२०१६ हे प्रकरण उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या न्यायालयात दाखल केले व त्याचे निकाल देखील आमच्या बाजूने लागले. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबाव वापरुन या दोन्ही प्रकरणांचा निकाल आम्ही आमच्या बाजूने लावून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/१०/१९५६ रोजी

कुंडलिक लिंबाजी पारखे यांनी दावा जमीनीचा भाडेपट्टा करार भगवंत कोंडीबा हिवरकर यांच्याकडून लिहून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीच्या सदर भाडेपट्टा कराराची मुदत १५ वर्षे इतकी होती. सदर भाडेपट्टा हा फक्त ऊसाच्या लागवडीकरीता होता, याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, लिहून देणार म्हणून भगवंत कोंडीबा हिवरकर यांची दावा जमीनी सदरी नोंद झाली.

५. हे म्हणणे खरे नाही की, ऊसाच्या लागवडीकरीता भगवंत कोंडीबा हिवरकर यांनी काही दिवस दावा जमीन त्यांच्या ताब्यात घेतली. या भाडेपट्टयाच्या अनुषंगाने तहसिलदार, श्रीरामपूर यांच्यासमक्ष भगवंत हिवरकर, खंडू तुकाराम चितळकर आणि कुंडलिक लिंबाजी पारखे या तिघांची चौकशी झाली होती, याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/०६/१९६५ रोजी तहसिलदार, श्रीरामपूर यांनी दावा जमिनीचा कब्जा भगवंत हिवरकर यांच्याकडून काढून खंडू तुकाराम चितळकर यांना दिला. हे म्हणणे खरे नाही की, भगवंत हिवरकर हे दि.२९/०८/१९४७ रोजीच्या गहाणखताच्या दस्ताच्या आधीपासून दावा जमीन कसत होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीच्या पिकपाहणी सदरी भगवंत हिवरकर यांच्या सन १९४७ आधीपासून नोंदी लागल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, फेर क्र.१०१८ अन्वये दावा जमिनीचा कब्जा तहसिलदार, श्रीरामपूर यांनी खंडु तुकाराम चितळकर यांना दिल्याबाबतचा मंजूर झाला होता. फेर क्र.१०१८ विरुध्द माझ्या आजोबांनी, वडीलांनी आणि मी स्वतः अपिल केलेले नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, खंडू तुकाराम चितळकर यांनी गहाणाची जमीन सोडून मिळण्याकामी माझे वडील मल्हारी कुंडलिक पारखे यांच्याविरुध्द नि.दि.दा.क्र.४५४/१९७८ हा दावा दाखल केला होता व दि.२९/०७/१९८३ रोजी हा दावा न्यायालयाने रद्द केला. हे म्हणणे खरे आहे की, त्या निकालाविरुध्द खंडू तुकाराम चितळकर यांनी जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले आणि सदरचे अपिल खंडू तुकाराम चितळकर यांच्या मृत्यूमुळे आणि वकील गैरहजर राहिल्यामुळे खारीज करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, या निकालाविरुध्द खंडू तुकाराम चितळकर यांच्या वारसांनी म्हणजेच प्रस्तूत प्रतिवादींनी श्रीरामपूर येथील जिल्हा न्यायालयात उशीर माफीच्या अर्जासह अपिल देखील दाखल केले.

७. हे म्हणणे खरे आहे की, मल्हारी कुंडलिक पारखे यांनी दावा जमिनी संदर्भात प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळण्याकरीता नि.दि.दा.क्र.१०५/१९९१ हा दावा दाखल केला होता व दि.११/०६/१९९६ रोजी सदर दावा न्यायालयाने खारीज (DID) केला. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीवर कब्जा नसल्याचे माहित असल्यामुळे दाव्यात यश येणार नाही अशी खात्री झाल्यामुळे ते जाणूनबुजून सदर दाव्यात गैरहजर राहिले. नि.दि.दा.क्र.१०५/१९९१ या दाव्यात माझ्या वडीलांनी दावा जमीन गहाणदार म्हणून त्यांच्या कब्ज्यात असल्याचे कथन केले होते, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.दि.दा.क्र.१०५/१९९१ या दाव्याच्या तारखांच्या दिवशी मी माझ्या वडीलांसोबत येत होतो. साक्षीदार स्वतः सांगतात की, वडील आजारी असल्याने ते त्यांच्यासोबत येत होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.दि.दा.क्र.१०५/१९९१ या दाव्यात खंडू तुकाराम चितळकर यांनी कैफियत दाखल करुन दावा जमिनीवरील आमचा कब्जा नाकारला होता. खंडू तुकाराम चितळकर यांनी दाखल केलेली कैफियत मी वाचून पाहिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीवर सन १९४७ च्या आधी पासून ते आजपर्यंत कधीही आमचा कब्जा नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा दावा खारीज झाल्यामुळे त्या गोष्टीचा गैरफायदा घेवून दावा जमीन ही आमच्या कब्ज्यात असल्याचे आम्ही खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल केला त्या दिवशी देखील दावा जमिनीवर प्रतिवादींचा ताबा होता.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.12.23 10:34:40 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २२/१२/२०२५